## नि.३०२ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते १८ यांना त्याच्या नांवे करुन दिलेली खरेदीखते न्यायालयात सादर करणेसाठी साक्षीसमन्स काढणेकरीता दाखल केला आहे.

२) वादी यांच्या कथनानुसार, वादीने प्रस्तुतचा दावा, दावा मिळकती संदर्भात प्रतिवादींना आज्ञार्थी ताकीद व कायमची ताकीद होणेकरीता तसेच दावा मिळकतीमधील संबंधित क्षेत्राचा कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते १८ यांनी नि. ४८ कडे कैफियत तसेच नि. २३१ कडे दावा दुरुस्तीनंतरची अतिरिक्त कैफियत सादर करुन दावा नाकारला आहे. सदर कैफियतींचे अवलोकन केले असता त्यांनी ते दावा मिळकतीमधील विवक्षित क्षेत्राचे विरुध्द कब्जाने मालक झाल्याचे कथन केले आहे व विविध तारखांच्या नोंदणीकृत खरेदीखतांनी संबंधित क्षेत्राचे मालक कब्जेदार झालेले आहेत असे कथन केले आहे. प्रतिवादी हे सदर खरेदीखताच्या आधारे दावा मिळकतीमध्ये वादीचा मालकी हक्क व कब्जा नाकारीत आहेत. प्रतिवादींना संधी देवूनही त्यांनी आपला पुरावा सादर केलेला नाही. नि. ४८ कडे सादर केलेल्या कैफियतीच्या परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद केलेली संबंधित क्षेत्राची त्यांचे नांवे करुन घेणेत आलेली मुळ खरेदीखते न्यायालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. दाव्याचा परिणामकारक निवाडा होण्यासाठी सदरची खरेदीखते आवश्यक आहेत. तरी प्रतिवादी क्र. १ ते १८ यांना सदरची मुळ खरेदीखते न्यायालयात सादर करण्यासाठी साक्षीसमन्स काढण्यात यावे अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३) प्रतिवादी क्र.१, २, ५, ६, ७, १०, ११, १३, १४, १६, व १७ यांनी प्रस्तुत अर्जावर नि. ३०३ कडे आपले म्हणणे सादर करुन अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादीचा अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी यांनी गांव मौजे कोलगांव येथील स. नं. २२७ हि. नं. १अ हि मिळकत दिनांक १२/१०/१९८८ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केली. सदर खरेदीखताची मुळ प्रत प्रतिवादी क्र. ८ कै. विठ्ठल गोविंद प्रभु हे दाव्याचे कामकाज पहात असल्याने त्यांच्याकडे होती. प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्यानंतर दाव्याचे कामकाज प्रतिवादी क्र. १ हे पाहू लागले. प्रतिवादी क्र. १ यांचा सदर खरेदीखताची मुळ प्रत दाव्याचे कामी सामील असेल असा समज होता. परंतु खरेदीखताची मुळ प्रत दाव्याचे कामी सामील नसल्याचे प्रतिवादी क्र. १ यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी सदर खरेदीखताचे मुळ प्रतिबाबत प्रतिवादी क्र. ८ चे वारसांकडे चौकशी केली असता ती मिळून आली नाही. त्यामुळे प्रतिवादीतर्फे दिनांक १२/१०/१९८८ रोजीच्या खरेदीखताची सहिसुद नक्कल दाव्याच्या कामी सामील करण्यात आली व ती नक्कल भारतीय पुरावा कायदा १८७२ चे कलम ६५ मधील तरतुदीनुसार दुय्यम पुरावा म्हणून वाचण्यात यावी याकरीता नि. २७१ कडे प्रतिवादींतर्फे अर्ज दाखल करण्यात आला. सदरचा अर्ज दिनांक ७/८/२०१८ रोजी मंजुर करण्यात आला. वादी ज्या खरेदीखताचा उल्लेख करीत आहे ते या दाव्याचे कामी सामील आहे. तसेच सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. ८, ३, ९ व १७ हे मयत असून त्यांचे वारसांबाबत तजवीज न केल्याने त्यांचेविरुध्द दावा अबेट करण्यात आला आहे. दाव्याच्या कामकाजास विलंब व्हावा या हेतुने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४) प्रतिवादी क्र. ८, ३, ९ हे मयत असून त्यांच्याविरुध्द दावा अबेट झालेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४, १२, १५ व १८ यांनी प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल न केल्याने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविण्यात येत आहे.

५) अभिलेखाचे अवलोकन केले व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

६) वादीने प्रतिवादींविरुध्द कायम ताकीद व आज्ञार्थी ताकीद होणेकरीता दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादींना खरेदीखत हजर करण्याकरीता साक्षीसमन्स काढावे अशी विनंती केली आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार दिनांक १२/१०/१९८८ रोजीचे मुळ खरेदीखत हे गहाळ झाले आहे. त्यामुळे त्यांनी नि. २७१ कडे अर्ज सादर करुन सदर खरेदीखताची सहीशिक्क्याची प्रत दुय्यम पुरावा म्हणून पुराव्यात वाचण्यासाठी परवानगी मागितली होती. त्याप्रमाणे त्यांना दिनांक ७/८/२०१८ रोजीच्या आदेशान्वये परवानगी देण्यात आली आहे. प्रतिवादीने नि. २४१/२ कडे दिनांक १२/१०/१९८८ रोजीच्या खरेदीखताची सहिसुद नक्कल /प्रमाणित प्रत दाखल केली आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींना पुन्हा खरेदीखत हजर करण्याकरीता साक्षीसमन्स पाठविणे आवश्यक नाही. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2025.09.12 15:48:31 +0530

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
सावंतवाडी

ठिकाण : सावंतवाडी
दिनांक १२/०९/२०२५